**पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.**

93, मल्हार पेठ, सातारा.

दुरध्वनी क्रमांक 02162-234130

Email - sp.satara@mahapolice.gov.in


************************************************************************************************

**प्रेसनोट** दिनांक:- २४/०८/२०२५

**फिटनेस का डोस - आधा घंटा रोज " फिट इंडिया मिशन " अंतर्गत सातारा जिल्हा पोलीस दलातर्फे दि.२४/०८/२०२५ रोजी सायक्लोथॉनचे आयोजन.**

भारत देशातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी भारत सरकारच्या क्रीडा मंत्रालय,नवी दिल्ली यांचे तर्फे **फिटनेस का डोस - आधा घंटा रोज " फिट इंडिया मिशन "** हा उपक्रम संपुर्ण भारतात राबविण्यात येत आहे.या उपक्रमामध्ये देशातील सर्व नागरिकांचा सहभाग राहावा यासाठी प्रशासकीय विभागातील सर्व घटकांना याबाबत वेगवेगळे उपक्रम राबविणेबाबत सुचित करण्यात आले आहे. **मा.श्रीमती रश्मी शुक्ला, पोलीस महासंचालक ,महाराष्ट्र राज्य मुंबई** यांनी राज्यातील सर्व पोलीस घटकांना भारत सरकारच्या उपक्रमांमध्ये " सायक्लोथॉन " घेण्याबाबत कळवले होते.

त्या अनुषंगाने दि.२४/०८/२०२५ रोजी सातारा जिल्हा पोलीस दलामार्फत " फिट इंडिया मिशन अंतर्गत १० कि.मी सायक्लोथॉन " चे आयोजन करण्यात आले होते. सदर सायक्लोथॉन मध्ये सर्व नागरिकांनी देखील सहभाग घेण्याबाबत **मा.श्री.तुषार दोशी , पोलीस अधीक्षक सातारा, मा.श्रीमती डॉ.वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सातारा, मा.श्री.अतुल सबनीस, पोलीस उप-अधीक्षक (गृह) सातारा** यांनी आवाहन केले होते.

दि.२४/०८/२०२५ रोजी १० कि.मी. सायक्लोथॉन चे आयोजन पोलीस कवायत मैदान येथुन सकाळी ०७.०० वा हिरवा झेंडा दाखवुन जुना RTO चौक - भुविकास बँक - करंजे नाका - ITI चौक - मोळाचा ओढा - कोंढवे गाव- कोंढवे न्यु इंग्लिश स्कुल शाळा येथुन पुन्हा त्याच मार्गे पोलीस कवायत मैदान येथे संपन्न झाली.

सदर सायक्लोथॉन मध्ये **मा.श्री.तुषार दोशी , पोलीस अधीक्षक सातारा,मा. श्रीमती, डॉ.वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सातारा,मा. श्री.अतुल सबनीस, पोलीस उप-अधीक्षक (गृह) सातारा, मा.श्री.विजय पाटील, पोलीस उपविभागीय अधिकारी पाटण, श्री.सुनिल चिखले, पोलीस उप-निरिक्षक, पोलीस कल्याण व मानवी संसाधन कार्यालय सातारा** यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला.तसेच सातारा जिल्हा पोलीस दलातील अधिकारी, पोलीस अंमलदार व त्यांचे कुटुंबीय, यांचेसह सायकल रायडर क्लब सातारा ,सायकल प्रेमी फाऊंडेश ग्रुप कोरेगाव व स्व.पै.खाशाबा जाधव सातारा पोलीस क्रीडा प्रबोधिनी यामधील प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थी अशा सुमारे २५०-३०० सायकलपटुंनी सहभाग नोंदविला तसेच सहभागी झालेल्या सायकल क्लब यांचा सन्मानचिन्ह देवुन गौरविणेत आले.या सायक्लोथॉनच्या माध्यमातुन नागरिकांना आपले आरोग्य चांगले व तंदुरुस्त राखणेबाबत संदेश पोहचविण्यात आला.

सदरचा कार्यक्रम हा मा.श्री.तुषार दोशी , पोलीस अधीक्षक सातारा,मा.श्रीमती.वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सातारा यांचे मार्गदर्शनाखाली श्री.अतुल सबनीस, पोलीस उप-अधीक्षक (गृह) सातारा.श्री.जगताप,(अति.कार्य.)राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय सातारा,श्री.सुनिल चिखले, पोलीस उप-निरिक्षक, पोलीस कल्याण व मानवी संसाधन कार्यालय सातारा,यांनी योग्य समन्वय ठेवुन पार पाडला.

---

**पोलीस अधीक्षक सातारा करिता**

**प्रति,**

**सर्व संपादक**